CNR No.MHLA090035672022

# म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्र.५८/२०२२ मधील निशाणी क्र.५ वर आदेश

(प्रिया व अन्य वि. उद्धव व इतर)

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ कलम २३ नुसार गैरअर्जदारांकडुन अर्जदार व तिच्या मुलाला दरमहा प्रत्येकी १,००,०००/– इतका अंतरिम पोटगी मिळण्याकरीता तसेच, गैरअर्जदारांच्या विरूध्द संरक्षण आदेश, अंतरिम निवास आदेश व अंतरिम मनाई हुकूमाचा आदेश मुळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. याकामी गैरअर्जदारांनी नि.क्र.१४ खाली प्रस्तुतच्या अर्जास गैरअर्जदारांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे व नि.क्र.१५ खाली पुरशीसद्वारे तेच म्हणणे हे अंतरिम अर्जास ग्राहय धरावे अशी विनंती केली आहे.

२. अर्जदारांच्या म्हणण्यानुसार, ती गैरअर्जदार क्र.१ ची कायदेशीर पत्नी असून त्यांचा विवाह दि.२०.०६.२०१० रोजी उदगीर येथे त्यांच्या धर्मातील रितीरिवाजाप्रमाणे झालेला आहे व त्यांचे पती पत्नीचे नाते आजतागायत कायम आहेत. गैरअर्जदार क्र.२ ही अर्जदाराची सासु असून गैरअर्जदार क्र.३ हा दिर आहे. गैरअर्जदार क्र.४ ही जाऊ व गैरअर्जदार क्र.५ व ६ ह्या ननंद व नंदवाई आहेत.

३. अर्जदारांच्या म्हणण्यानुसार, लग्नानंतर अर्जदार क्र.१ ही तिच्या सासरी मौजे लोहारा, ता.उदगीर येथे नांदायला गेली. सुरूवातीचे काही दिवस चांगले नांदविल्यानंतर गैरअर्जदारांनी अर्जदार हिला लग्नामध्ये

तिच्या आई वडीलांनी योग्य तो मानपान केला नाही तसेच, किमती वस्तु दिल्या नाहीत या कारणांवरून शिवीगाळ करणे, अपमानास्पद वागणुक देणे व टोमणे मारणे अशा प्रकारचा त्रास देण्यास सुरूवात केली. दरम्यानच्या काळात तिला गैरअर्जदार क्र.१ पासुन कृष्णा हा मुलगा जन्माला आला.

४. अर्जदार पुढे कथन करते की, डॉक्टरांच्या चुकीमुळे कृष्णा हा मतिमंद जन्माला आला. त्यामुळे त्याची दैनंदिन कामे व विधी हे दुसऱ्याच्या मदतीनेच केली जातात. अर्जदाराने विनंती करून सुध्दा गैरअर्जदार क्र.१ उद्धव हा मुलाला जवळ घेत नसत तसेच, चिडचिड करून दुर्लक्ष करीत असे. गैरअर्जदार क्र.१ ची कुठलीही साथ अर्जदारास कृष्णा याला सांभाळण्यास मिळाली नाही. गैरअर्जदाराच्या अशा वागण्यामुळे अर्जदार ही मागील चार ते पाच वर्षापासुन तिच्या मुलाला तिच्या आई वडीलांकडे दिवसभर सोडुन दुकानात काम करीत असे.

५. अर्जदाराच्या कथनानुसार ती घरातील सगळे काम आटोपुन दिवसभर दुकान सांभाळायची परंतु, गैरअर्जदार क्र.१ हा वेगवेगळी खोटी कारणे सांगुण सतत पुणे, मुंबई इत्यादी शहरांमध्ये जाऊन परस्त्रींशी गमण करीत असे. अशा प्रकारे त्याने अर्जदाराचा विश्वासघात केलेला आहे. अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांनी कमाविलेल्या एकत्रीत नफ्यातुन गैरअर्जदार क्र.१ च्या नावे मौजे मलकापूर, ता.उदगीर येथे प्लॉट घेऊन गोडावुन बांधणे सुरू केले आहे. सदरचे काम हे अर्जदाराने दुकानात केलेल्या महेनतीच्या पैशांच्या जोरावर गैरअर्जदार क्र.१ याने पुर्ण केले आहे.

६. अर्जदार क्र.१ च्या म्हणण्यानुसार गैरअर्जदार क्र.१ चा मित्र महादेव होणाळे हा गैरअर्जदाराला त्याच्या आवडीनुसार स्त्रीयांचा पुरवठा करीत असे. त्याचे परस्त्रीं सोबत असलेले अश्लील फोटो अर्जदाराने मोबाईलवर पाहीले आहे. त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ याचा संसारात कसलाच

रस राहीलेला नाही. तो सतत परस्त्रींशी गमण करून पहाटे घरी येत असे. याबाबत, अर्जदाराने इतर गैरअर्जदारांना सांगीतले परंतु, त्यांनी गैरअर्जदार क्र.१ ला समजावुन न सांगता त्याचे लग्न दुसऱ्याशी करून देण्याचे प्रोत्साहन दिले. इतर गैरअर्जदारांच्या सांगण्यांवरून गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदारासोबत भांडणे करून मारहाण करीत असे. तसेच, गैरअर्जदार हे अर्जदाराला तुझ्या पोटात गाठ आहे या कारणावरून गैरअर्जदार क्र.१ ला दुसरे लग्न करण्याची परवाणगी दे म्हणुन दबाव टाकत असे.

७. अर्जदार पुढे कथन करते की, गैरअर्जदारांनी गैरअर्जदार क्र.१ चे लग्न प्रतिक्षा पाटील या मुलीसोबत बेकायदेशीरपणे लावून दिले आहे. तसेच, तिला मौजे मलकापूर येथील गोडाऊनच्या मागे असलेल्या घरात ठेवले आहे. सदर गोष्टींची वाच्यता केल्यास अर्जदारास जिवे मारण्याची धमकी सुध्दा दिली. त्या कारणामुळे गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार व तिच्या मुलाला अन्न, वस्त्र, औषध व अत्यावश्यक गोष्टींसाठी आर्थिक मदत करीत नाही. उलट, अर्जदाराने माहेरी निघुन जाण्यासाठी तिचा आतोनात छळ करीत आहे. दि.१३.०९.२०२२ रोजी गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदारास दारू पिऊन अश्लील शिवीगाळ केली व मारहाण करून घराबाहेर काढले परंतु, पोलीसांच्या मदतीने ती परत सासरी नांदण्यास आली.

८. अर्जदार पुढे कथन करते की, अर्जदाराने दि.०९.१०.२०२२ रोजी गैरअर्जदार क्र.१ याच्याकडे आर्थिक मदतीची मागणी केली असता त्याने स्पष्टपणे नकार दिला. अर्जदार व तिचा मुलगा हे गैरअर्जदार क्र.१ ने दिलेल्या आर्थिक मदतीवर आवलंबुन आहेत. गैरअर्जदार क्र.१ यांच्या नावे व संयुक्त एकत्रीत कुटूंबाच्या नावे मौजे लोहारा येथे १ हे. ८० आर जमीन असून उदगीर येथे मालमत्ता क्र.५–१–२०४/१ (जुना), ५–१–२३५/१ (नवीन) तसेच, मौजे मलकापूर येथे गैरअर्जदाराच्या नावे प्लॉट क्र.८४, ८५, ८६, ८७, ८८, ८९ ज्याचा ग्राम पंचायत मालमत्ता क्र.४६२५ असा

आहे. अर्जदार पुढे सांगते की, उदगीर येथे ओमकार इलेक्ट्रॉनिक्सचे दुकान सुध्दा गैरअर्जदार क्र.१ च्या नावे आहे व तो विविध नामांकित कंपण्यांचा होलसेल डिलरसुध्दा आहे.

९. अर्जदाराच्या कथनानुसार गैरअर्जदार क्र.१ याचे वार्षीक उत्पन्न २ कोटी रूपयांचे आहे. सबब, तो अर्जदार व तिच्या मुलाला प्रति महिणा प्रत्येकी १,००,०००/– रूपये अंतरिम पोटगी देऊ शकतो. त्याच प्रमाणे अर्जदार हे गैरअर्जदार क्र.१ चे वारस असल्याकारणाने त्यांचा गैरअर्जदार क्र.१ च्या मालमत्तेवर संयुक्त अधिकार आहे. सबब, त्याने त्याच्या नावे असलेली मालमत्तेचे हस्तांतरण करू नये म्हणुन अंतरिम मनाई हुकूमाचा आदेश सुध्दा मागीतला आहे.

१०. अर्जदार ही गैरअर्जदार यांच्या उदगीर येथे असलेल्या मालमत्ता क्र.५–१–२०४/१ (जुना), ५–१–२३५/१ (नवीन) घरात राहत आहे. त्यामुळे संरक्षण आदेश व मुळ दाव्याचा निकाल लागे पर्यंत घरातुन बेदखल करू नये म्हणुन अंतरिम निवासी आदेश सुध्दा मागत आहे.

११. गैरअर्जदारांच्या **नि.क्र.१४** खालच्या कथनानुसार, अर्जदारांनी गैरअर्जदारास त्रास देण्याच्या व पैसे उकळण्याच्या वाईट हेतुने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. गैरअर्जदाराने अर्जदारासोबत असलेले नाते मान्य केलेले आहे. परंतु, लग्नाचा खर्च त्यांनी स्वतः उचलला आहे असे कथन केले आहे. अर्जदाराचे सर्व कथन गैरअर्जदारांनी अमान्य केले असून फक्त कृष्णा बाबतची वैद्यकीय अवस्था मान्य केली आहे. गैरअर्जदार कथन करतात की, अर्जदार हे गैरअर्जदारांसोबतच त्यांच्या मालमत्ता क्र.५–१–२०४/१ (जुना), ५–१–२३५/१ (नवीन) घरात उदगीर येथे राहत आहेत व त्यांच्या सर्व जबाबदाऱ्या गैरअर्जदार क्र.१ उचलत आहे. त्यामुळे त्यांना वेगळी पोटगी मागण्याचा कुठलाही अधिकार नाही.

१२. गैरअर्जदारांनी हे मान्य केले आहे की, गैरअर्जदार क्र.१ हा वेगवेगळया कंपण्यांचा वितरक आहे. परंतु, त्याला त्याचे व्यवसाय चालविण्यासाठी बँकेतुन वेळोवेळी कर्ज काढावे लागलेले आहे. त्याच्यावरती त्याच्या आईची व व्यवसायाची सर्वस्वी जबाबदारी आहे. गैरअर्जदार पुढे असे कथन करतात की, त्यांनी दुकान नगर पालिका मिळकत क्र.५–१–२३५/१ या मिळकतीवर व मलकापुर येथील गो–डाऊनच्या मिळकत क्र.४६२५ या मिळकतीवर व्यवसायासाठी १,७०,००,०००/– रूपयांचे कर्ज बँक ऑफ महाराष्ट्र शाखा उदगीर कडुन घेतलेले आहे. तसेच, वरील मिळकती ह्या बँकेत गहाण आहेत. सबब, त्याला कर्जाचे हफ्ते असल्याकारणाने अर्जदारांना वेगळी पोटगी देण्याची ऐपत व उत्पन्न नाही.

१३. गैरअर्जदारांच्या कथनानुसार अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदाराच्या आई सोबत उद्धटपणे वागत असे व तिचा अपमान करीत असे. अर्जदार क्र.१ जेंव्हा गर्भवती होती तेंव्हा तिने वारंवार सांगुन सुध्दा स्वतःची योग्य अशी काळजी घेतली नाही. त्यामुळे अर्जदार क्र.२ हा मतिमंद जन्मास आला. अर्जदार क्र.१ हिला सुरूवातीपासुनच संसारामध्ये कुठलीच रूची नव्हती. तिने स्वतःहुन गैरअर्जदार क्र.१ शी शारिरीक संबंध लग्न झाल्यापासुनच टाळण्यास सुरूवात केली होती. अर्जदार ही स्वतःहुन स्वयंपाक करीत नसल्याकारणाने गैरअर्जदार क्र.१ याला बाहेरून मेस तसेच हॉटेलमध्ये जाऊन जेवण करावे लागत असे. त्यांनी अर्जदार क्र.२ साठी सन २०१३ ते सन २०१७ पर्यंत जवळपास १५,००,०००/– रूपयांचा वैद्यकीय खर्च केल्याचे कथन केले आहे.

१४. गैरअर्जदार पुढे कथन करतात की, गैरअर्जदार क्र.२ च्या परिस्थीतीत कुठलाही फरक पडत नसल्याकारणाने त्याला पुणे येथील के.ई.एम.हॉस्पीटल व इतर दवाखाण्यात नेऊन डॉक्टरांच्या सल्ल्याने ब्रेन टेस्ट व औषधोपचार केले. ज्याचा अंदाजित खर्च ४,००,०००/– रूपये

आलेला आहे. गैरअर्जदार पुढे कथन करतात की, सन २०१२ मध्ये अर्जदार क्र.१ च्या वडीलांनी घर खरेदीसाठी गैरअर्जदार क्र.१ कडुन हात ऊसणे १४,००,०००/- रूपये घेतलेले आहे. तसेच, अर्जदार क्र.१ च्या मोठया बहिणीच्या विवाहाच्या वेळेस गैरअर्जदार क्र.१ याने दोन लाख रूपयांची मदत केलेली आहे.

१५. गैरअर्जदार कथन करतात की, अर्जदार ही त्यांच्या दुकानातील कामगार बालाजी बन्साळे याच्याशी संगणमत करून गैरअर्जदार क्र.१ च्या सहीचा कोरा धनादेश मिळविण्याचे कारस्थान ऑगस्ट २०२२ मध्ये केले होते. परंतु, काही कारणांनी ते फसले. त्यामुळे अशा प्रकारे अर्जदार ही गैरअर्जदारांना शारिरीक व मानसिक त्रास देत आहे. त्यामुळे गैरअर्जदार हे गो-डाऊनच्या घरी मलकापूर येथे राहत आहेत. अर्जदाराला विवाहात दिलेले २० तोळे सोने तिने परस्पर तिच्या वडीलांना नेऊन दिलेले आहे. मार्च २०१४ मध्ये अर्जदाराच्या आई वडीलांच्या घरी गैरअर्जदारांची बैठक सुध्दा झाली. त्यामध्ये अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ याला शरीर सुखापासुन वंचित ठेवत असल्याची बाब निदर्शनास आणुन दिली. परंतु, त्याचा काहीही परिणाम अर्जदारावर झालेला नाही. तसेच, सन २०१७ मध्ये अर्जदाराने कोणालाही न विचारता तिच्या मुलाला स्वतःच्या आई वडीलांकडे ठेऊन दिले. पुन्हा एकदा फेब्रुवारी २०१९ मध्ये अर्जदाराच्या स्वभावात बदल घडुन आणण्यासाठी तिच्या घरी बैठक घेण्यात आली. ज्यामध्ये तिचा भाऊ माधव, सहदेव, कमलाकर मजगे, अशोक कारभारी इत्यादी लोक हजर होते. परंतु, त्याचा सुध्दा कुठलाही परिणाम अर्जदारावर झालेला नाही.

१६. गैरअर्जदार पुढे कथन करतात की, अर्जदार ही वेळोवेळी दुकानात गल्ल्यावरती बसुन होत असलेल्या विक्रीच्या धनराशीमधुन काही रक्कम काढुन घेत असे व लपवुन आपल्या आई वडीलांना देत असे आणि

जेंव्हा गैरअर्जदार क्र.१ याने कारण विचारले असता ती त्याच्या सोबत भांडण करीत असे. गैरअर्जदाराच्या म्हणण्यानुसार अर्जदारांचा सर्व खर्च गैरअर्जदार क्र.१ करीत आहेत. त्यामुळे तिच्या कुठल्याही गरजा उपलब्ध राहत नाहीत. सबब, प्रस्तुतचा अर्ज खारीज करण्याची विनंती केली आहे.

१७. उभय पक्षांच्या कथनांच्या पार्श्वभुमीवर प्रस्तुत अर्जाच्या निर्णयाप्रत पोहोचण्याकरीता खालील मुद्दे विचारार्थ येतात. सदर मुद्यांवर सुसंगत कारणमिमांसेसह निष्कर्ष नोंदविले, ते खालील प्रमाणे–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| (१) | अर्जदार क्र.१ ही तिच्या वरती प्रथमदर्शनी कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे सिध्द करते काय ? | होय. |
| (२) | अर्जदार हे अंतरिम संरक्षण आदेश मिळण्यास पात्र आहेत काय ? | होय. |
| (३) | अर्जदार हे राहत असलेल्या घरातुन त्याचा घर क्र.५–१–२३५/१(नविन) गैरअर्जदाराने हाकलुन देऊ नये म्हणुन तसेच, गैरअर्जदारांना अर्जात नमुद मालमत्तेचे हस्तांतरण करू नये म्हणुन कलम १९ अन्वये अंतरिम आदेश मिळण्यास पात्र आहे ? | अंशतः होकारार्थी |
| (४) | अर्जदार क्र.१ व तिचा मुलगा नामे कृष्णा हे गैरअर्जदारांकडुन प्रतिमाह रक्कम रूपये १,००,०००/– प्रत्येकी अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? | अंशतः मंजुर अर्जदार क्र.१ हिला रूपये ५,०००/– व अर्जदार क्र.२ याला |

| | | |
|---|---|---|
| | असल्यास किती व कोणाकडुन ? | रूपये २,०००/- प्रति माह गैरअर्जदार क्र.१ याच्या कडुन |
| (५) | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ व २ एकत्रीतः-**

१८. वरील दोन्ही मुद्दे एकमेकांशी संबंधीत असल्याने एकत्रीत विचारात घेतले आहे. अर्जदार क्र.१ ने तिच्या अर्जासोबत तिच्या व गैरअर्जदार क्र.१ च्या लग्नाची पत्रीका दाखल केली आहे. तसेच, गैरअर्जदारांना अर्जदारांसोबत असलेले नाते मान्य असल्याकारणाने त्याबद्दल उहापोह करण्याची गरज नाही. वरील मुद्यांचा विचार केला असता दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. ज्यामध्ये अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ सोबत राहत होती किंवा आहे काय ? तसेच, तिच्या वरती प्राथमिक दृष्टया कौटंबिक हिंसाचार झाला आहे काय ? अर्जातील व गैरअर्जदारांनी दिलेल्या लेखी जबाबाचा **नि.क्र.१४** चे अवलोकन केले असता ही बाब स्पष्ट होते की, अर्जदार हे गैरअर्जदारांसोबत त्यांच्या नगर परिषद घर क्र.५-१-२३५/१(नविन), उदगीर येथे राहत आहेत. सबब, हे सिध्द होते की, अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदारांसोबत लग्न झाल्यानंतर घरगुती संबंधात एकाच छताखाली राहत आहेत. आता हे बघणे महत्वाचे ठरेल की, अर्जदार क्र.१ हिच्या वरती प्राथमिकदृष्टया कौटूंबिक हिंसाचार झाला किंवा कसे.

१९. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ कलम ३ नुसार अर्जदाराने तिच्यावर कसा प्राथमिकदृष्टया कौटुंबिक हिंसाचार झाला आहे हे सिध्द करणे गरजेचे असते. अर्जदाराने तिच्या

अर्जातील परिच्छेद क्र.३, ४, ८ व १० मध्ये तिच्यावर कसा कौटुंबिक हिंसाचार केला आहे याबद्दलचे कथन केले आहे. त्याबाबत तिने स्वतःचे शपथपत्र सुध्दा अभिलेखावर दाखल केले आहे. अर्जदारावर प्राथमिकदृष्टया कौटूंबिक हिंसाचार झाला आहे किंवा कसे या निष्कर्षास येण्याकरीता कौटूंबिक हिंसाचार विरोधी कायदा २००५ कलम ३ नुसार कौटूंबिक छळ म्हणजे शारिरीक, शाब्दीक, लैंगिक, मानसिक किंवा आर्थिक छळ, हुंडा किंवा मालमत्ता देण्यासाठी महिलेला अपमाणित करणे, शिवीगाळ करणे किंवा धमकावणे या कृती कौटूंबिक हिंसाचार समजण्यात येतात. अर्जाचे व त्यावरील दाखल गैरअर्जदारांच्या लेखी जबाबाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दोघांमध्ये वेगवेगळया गोष्टींवरून वाद सुरू आहेत. अर्जदारांनी ज्या प्रमाणे गैरअर्जदारांवर व त्यांच्या वागण्यावर आक्षेप घेतलेले आहेत त्याच प्रमाणे गैरअर्जदारांनी सुध्दा अर्जदार कशी त्यांना त्रास देते याबाबत लेखी म्हणणे दिले आहे. परंतु, अशा परिस्थीतीमध्ये जेंव्हा अर्जदार ही न्यायालयासमोर येऊन प्रस्तुतचे प्रकरण दाखल करते व शपथेवरती सगळया गोष्टी मान्य करते त्यावरून प्राथमिकदृष्टया तिच्या वरती कौटुंबिक हिंसाचार झाला किंवा होत आहे या निष्कर्षास येणे जास्त बरोबर ठरते.

२०. अर्जदाराने शपथेवरती सांगीतले आहे की, गैरअर्जदार तिला शारिरीक, शाब्दीक, तिला अपमाणित करणे, शिवीगाळ करणे किंवा धमकावणे या कृती करत आहेत. तसेच, दि.१३.०९.२०२२ रोजी अश्लील शिवीगाळ करून घराबाहेर हाकालले होते आणि दि.०९.१०.२०२२ रोजी तिला व तिच्या मुलाला आवश्यक गोष्टींसाठी आर्थिक मदत करणार नाही याबद्दल सांगीतले होते यावरून हे प्राथमिकदृष्टया सिध्द होते की, अर्जदारावर कौटूंबिक हिंसाचार झाला आहे. सबब, अशा परिस्थीतीमध्ये ती अंतरिम संरक्षण मिळण्यास पात्र आहे. करीता, मी मुद्दा क्र.१ व २ चे उत्तर होकारार्थी नोंदवुन त्याप्रमाणे निष्कर्ष नोंदवितो.

## मुद्दा क्र.३ करीताः–

२१. मी मुद्दा क्र.१ व २ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदविल्यामुळे हे प्राथमिकदृष्टया सिध्द होते की, अर्जदार हिच्यावर गैरअर्जदारांकडुन कौटूंबिक हिंसाचार झालेला आहे. दोन्ही पक्षांच्या कथनकाच्या अवलोकनावरून हे दिसुन येते की, अर्जदार हे गैरअर्जदारांच्या उदगीर येथील घरात ज्याचा न.प.क्र.५–१–२३५/१ राहत आहेत. अर्जदार हिला त्याच घरात मुळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत राहण्यास कुठलीही हरकत दिसुन येत नाही. तिने या अंतरिम अर्जाद्वारे दुसरे घर किंवा घरभाडे मागीतलेले नाही. तिला या अर्जामध्ये अंतरिम संरक्षण आदेश दिलेला आहे. तसेच, गैरअर्जदाराचे सुध्दा असे कुठलेही कथन नाही की, अर्जदारांनी त्यांच्या सोबत राहू नये किंवा त्यांना नव्या घरात ठेवण्याची कुठलीही तयारी त्यांनी दर्शविलेली नाही. या सर्व गोष्टींचा विचार केला असता असे दिसुन येते की, दोन्ही पक्षकारांना एकमेकांसोबत एकाच घरात राहायचे आहे. मी मुद्दा क्र.२ मध्ये अर्जदाराला कौटूंबिक हिंसाचारापासुन संरक्षण दिलेले आहे. सबब, मुद्दा क्र.३ च्या उत्तराखातर असा आदेश करण्यात येतो की, गैरअर्जदारांनी अर्जदारांना त्यांच्या राहत्या घरातुन ज्याचा न.प.क्र.५–१–२३५/१ मुळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत हाकालण्यापासुन प्रतिबंध करण्यात येते.

२२. अर्जदारांनी त्यांच्या या अर्जामध्ये गैरअर्जदारांना त्यांच्या नावे असलेल्या मालमत्तेचे अर्जदारांच्या परवाणगीशिवाय इतर कोणासही हस्तांतरण करू नये म्हणुन अंतरिम मनाई हुकूमाचा आदेश सुध्दा मागीतलेला आहे. अर्जदारांनी गैरअर्जदार क्र.१ याच्या नावे मलकापूर येथे स्थित असलेल्या मालमत्ता क्र.४६२५ चा नमुना क्र.८ अभिलेखावर दाखल केलेला आहे. गट क्र.४१७, ७२ च्या ७/१२ च्या उताऱ्याची प्रत सुध्दा दाखल केलेली आहे. या व्यतिरिक्त अजुन कुठलेही मालमत्तेचे कागदपत्रे अभिलेखावर दाखल केलेले नाही. अर्जदार यांना मान्य आहे की, ते

गैरअर्जदार यांच्याच घरात त्यांच्या सोबत राहतात. सदरील बाब विवादीत नाही. गैरअर्जदारांच्या कथनानुसार अर्जदार हे त्यांच्या सोबत राहत असल्यामुळे त्यांचा सर्व खर्च गैरअर्जदार क्र.१ हा उचलत आहे. तसेच, गैरअर्जदार क्र.१ हा व्यापारी असून त्याचे विविध व्यवसाय असल्याबाबतची बाब सुध्दा अर्जदारांना मान्य आहे. गैरअर्जदार यांनी त्यांच्या व्यवसायासाठी घेतलेले कर्ज व त्याच्या वरती असलेल्या आर्थिक जबाबदाऱ्या या शपथेवर सांगीतलेल्या आहेत. सबब, त्याच्या व्यवसायाचे स्वरूप लक्षात घेता त्याला बऱ्याच वेळेस मालमत्ता कर्जास तारण म्हणुन गहाण ठेवाव्या लागतात. त्याबाबतची बाब सुध्दा गैरअर्जदार क्र.१ याने त्याच्या लेखी जबाबात मान्य केलेली आहे. गैरअर्जदारांनी मुळ अर्ज दाखल व्हायच्या आधीच त्याच्या नावे असलेल्या मालमत्ता बँक ऑफ महाराष्ट्र यांच्याकडे रक्कम रूपये १,५०,००,०००/- च्या कर्जासाठी तारण केल्याचे त्याच्या शपथपत्रात म्हटले आहे. सबब, वरील सर्व बाबींचा विचार करता व गैरअर्जदार करीत असलेल्या व्यवसायाचे स्वरूप पाहता त्याला कलम १९ खालच्या अंतरीम मनाई हुकूमाच्या आदेशान्वये प्रतिबंध करणे चुकीचे ठरेल. करीता, अर्जदार यांची सदरील मागणी नामंजुर करण्यात येते. सबब, मुद्दा क्र.३ चे उत्तर मी अंशतः होकारार्थी नोंदवुन त्याप्रमाणे निष्कर्ष नोंदवितो.

## मुद्दा क्र.४ करीताः-

२३. अर्जदार क्र.१ हिने तिच्यासाठी व तिचा मुलगा नामे कृष्णा यासाठी गैरअर्जदारांकडुन प्रतिमाह रक्कम रूपये १,००,०००/- प्रत्येकी अंतरिम पोटगी मागीतली आहे. अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ यांचा मुलगा कृष्णा हा जन्मतःच मतिमंद आहे. अर्जदार क्र.१ हिने असे कथन केले आहे की, गैरअर्जदार क्र.१ हा वडील या नात्याने कृष्णाची कुठलीच काळजी घेत नाही व त्याच्यासाठी कुठलेच वेगळे आर्थिक प्रयोजन केलेले नाही. अर्जदार क्र.१

च्या कथनानुसार ती दुकान सांभाळुन अर्जदार क्र.२ याची काळजी घेते. त्याला लागत असलेल्या सर्व आवश्यक बाबी पुरविते. तसेच, त्याचे वैद्यकीय खर्च सुध्दा स्वतःच्या आई वडीलांकडे पैसे मागुन पुरवते.

२४. अर्जदार क्र.१ हिचे दुसरे महत्वाचे कथनक असे आहे की, गैरअर्जदार क्र.१ हा परस्त्रीयांशी गमन करतो व घराकडे लक्ष देत नाही. त्याचप्रमाणे त्याने प्रतिक्षा शिवराज पाटील या मुलीशी लग्न करून तिला मलकापूर येथील त्याच्या घरात ठेवले आहे. गैरअर्जदार क्र.१ त्याचे पुर्ण उत्पन्न प्रतिक्षा राहते त्या घरावर व तिच्यावर उडवितो. त्यामुळे त्याला अर्जदारांची कुठलीही गरज राहीलेली नाही. सबब, तो त्यांच्या दैनंदिन गरजा सुध्दा भागवत नाही आणि याच कारणामुळे अर्जदारांना गैरअर्जदारांकडुन दरमहा प्रत्येकी रक्कम रूपये १,००,०००/- अंतरिम पोटगी गरजेची आहे.

२५. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ च्या कलम २० नुसार पिडीत व्यक्तीला आणि तिच्या मुलाला कौटुंबिक हिंसाचारामुळे करावा लागलेला खर्च तसेच, सोसाव्या लागलेल्या हाणीच्या भरपाईसाठी व त्यांच्या निर्वाहासाठी गैरअर्जदाराला अंतरिम आर्थिक सहाय्य करण्याचे आदेश देता येतात. या कलमाच्या आधारे न्यायालयाला पिडीत व्यक्तीस मिळकतीची हाणी, वैद्यकीय खर्च, तिला झालेल्या नुकसानाची हाणी इत्यादी करीता आर्थिक सहाय्याचे आदेश देता येतात. प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये अर्जदाराने कथन केले आहे की, गैरअर्जदार क्र.१ हा विविध नामांकित कंपण्यांचा वितरक आहे व तसेच, त्याच्या नावे चल व अचल मालमत्ता उदगीर, लोणी व मलकापूर या ठिकाणी स्थीत आहे. त्याला ह्या सर्व मालमत्तेतुन व व्यवसायातुन दरवर्षी दोन कोटी रूपयांचे उत्पन्न होते. याबाबत, अर्जदारांनी **नि.क्र.२२** खालील यादी प्रमाणे न्यु. ओमकार एजन्सीचे आर्थिक विवरणपत्र दाखल केले. परंतु त्यामध्ये फायदा

व तोटयाबाबतच्या वेगवेगळया नोंदी दिसुन येतात ज्यावरून गैरअर्जदार क्र.१ याचे उत्पन्न दोन कोटी आहेत असे म्हणता येणार नाही. त्याबाबतचा ठोस लेखी पूरावा अर्जदाराने अभिलेखावर आणलेला नाही. या उलट गैरअर्जदार क्र.१ याने त्याच्यावर असलेल्या कर्जांचे व वार्षीक उत्पन्नाचे विवरणपत्र अभिलेखावर दाखल केले आहेत.

२६. गैरअर्जदाराने अर्जदार क्र.२ च्या उपचाराबाबतचे विविध डॉक्टरांचे अभिप्राय व त्याला दिलेल्या विविध दवाखाण्यांमधील केलेल्या उपचारांचे अहवाल आणि झालेल्या खर्चाबाबतची बिले अभिलेखावर दाखल केलेली आहे. ज्यावरून प्राथमिकदृष्टया असे दिसते की, तो अर्जदार क्र.२ कृष्णा याचा वेळोवेळी वैद्यकीय उपचार करीत आहे. याउलट अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ चे खर्च उचलत आहे याबाबत कुठलाही प्राथमिक पुरावा अभिलेखावर नाही. गैरअर्जदार क्र.१ याने त्याच्या शपथपत्रात त्याच्यावर असलेल्या कर्जाचे कथन केलेले आहे. त्याच्या लेखी जबाबात तो मान्य करतो की, तो दोन्ही अर्जदारांचे पालनपोषण सुध्दा करीत आहे. परंतु, मुद्दा क्र.१ व २ च्या निष्कर्षानुसार अर्जदार क्र.१ हिच्यावर प्राथमिकदृष्टया कौटूंबिक हिंसाचार झाल्याचे दिसुन येते. गैरअर्जदार क्र.१ याने केलेल्या दुसऱ्या लग्नाची बाब सुध्दा अर्जदारांनी शपथपत्रात नमुद केलेली आहे. अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार क्र.१ ची कायद्याची पत्नी आहे व तिला आणि तिच्या मुलाला सांभाळण्याची, त्यांना योग्य आर्थिक सहाय्य करण्याची पुर्ण जबाबदारी गैरअर्जदार क्र.१ याची पती या नात्याने आहे. जरी, अर्जदार हे गैरअर्जदारांच्या घरात राहत असतील तरी गैरअर्जदार क्र.१ ची ही नैतिक जबाबदारी आहे की, त्याने अर्जदारांचे दैनंदिन खर्च व इतर आवश्यक गोष्टींसाठी आर्थिक सहाय्य दिले पाहिजे.

२७. अभिलेखावर उपलब्ध कागदपत्रानुसार असे दिसुन येते की, कृष्णा याच्या नावे गैरअर्जदारांनी गट क्र.७२ मध्ये १ हे. २० आर एवढी

जमीन केलेली आहे. अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदारांसोबत त्यांच्याच घरात राहत असल्याची बाब सुध्दा विवादीत नाही. परंतु, जेंव्हा प्रकरण न्यायालयात येते तेंव्हा प्राथमिक अंदाज असा काढता येतो की, अर्जदार व गैरअर्जदार यांचे संबंध पुर्वीसारखे राहीलेले नाहीत. त्यामुळे अशा परिस्थीतीमध्ये अर्जदारांना सन्मानाने जगता यावे, त्यांचे सर्व आवश्यक खर्च पुर्ण व्हावे या दृष्टीने त्यांना गैरअर्जदार क्र.१ याने आर्थिक मदत करणे गरजेचे ठरेल. परंतु, अर्जदारांनी त्यांना दरमहा प्रत्येकी १,००,०००/– रूपये अंतरिम पोटगी देण्याची विनंती केली आहे. त्यांच्या अर्जातील म्हणण्यानुसार गैरअर्जदार भरपूर श्रीमंत आहे आणि ते ती रक्कम अर्जदारांना देऊ शकतात. पण गैरअर्जदारांची श्रीमंती हा अर्जदारांना पाहिजे तेवढी अंतरिम पोटगी आदेश देण्यासाठी एकमेव मुद्दा नाही. अर्जदारांनी प्राथमिकदृष्टया सिध्द करणे गरजेचे असते की, त्यांना रक्कम रूपये १,००,०००/– का व कशासाठी आवश्यक आहे. परंतू, प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये अर्जदार तसे सिध्द करण्यास असक्षम राहीलेले आहेत.

२८. अर्जदारांनी त्यांना दरमहा किती खर्च येतो याबाबत सविस्तर दृष्टया खर्चाचे विवरण सुध्दा दिलेले नाही. त्याच प्रमाणे गैरअर्जदारांनीसुध्दा ते अर्जदारांना आर्थिक मदत दरमहा करतात याबाबत काही उल्लेख केलेला नाही किंवा त्यांचे तसे निवेदन सुध्दा नाही. त्यामुळे अर्जदारांच्या किमान जिवणावश्यक गरजांच्या पुर्तीसाठी कोणतीही आर्थिक उपाययोजना केल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे अर्जदार गैरअर्जदार यांचे राहणीमान, गैरअर्जदाराचे किमान उत्पन्न, त्यावर असलेले खर्च, प्रचलित महागाई दर इत्यादी बाबींचा विचार करता गैरअर्जदार क्र.१ याने अर्ज दाखल तारखेपासून, अर्जदार क्र.१ हिला दरमहा रुपये ५,०००/– व अर्जदार क्र.२ याला दरमहा रूपये २,०००/– अंतरिम पोटगी देणे न्याय्य व योग्य राहील. सबब त्या अनुशंगाने मी माझे निष्कर्ष मुद्दा क्र.४ नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.५ करीताः–**

२९. वर नमुद केल्याप्रमाणे मी अर्जदार क्र.१ हिला दरमहा रुपये ५,०००/– व अर्जदार क्र.२ याला दरमहा रूपये २,०००/– अंतरिम पोटगी अर्ज दाखल दिनांकापासून ते मुळ तक्रार अर्ज निकाली लागेपर्यंत मिळण्यास पात्र असल्याबाबतचा निष्कर्ष नोंदविला आहे. दोन्ही पक्षकार त्यांचा अर्ज कायद्याला अनुरूप लढत आहेत. सदरचे प्रकरण सध्या प्राथमिक स्वरूपात आहे. सबब, या अर्जाचा खर्च कोणा एकावर टाकणे योग्य नाही. सबब, मुद्दा क्र.५ करीता मी पुढील प्रमाणे आदेश करीत आहेः–

## आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो. |
| २. | गैरअर्जदारांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अर्जदारांवर कुठल्याही प्रकारचा कौटूंबिक हिंसाचार करू नये. |
| ३. | गैरअर्जदारांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अर्जदार क्र.१ व २ यांना ते राहत असलेल्या घर न.प.क्र.५–१–२३५/१(नविन) उदगीर येथील घरातुन मुळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत बाहेर काढु नये. |
| ४. | गैरअर्जदार क्र.१ याने प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासून ते मुळ तक्रार अर्जाचा निकाल लागेपर्यंत अर्जदार क्र.१ हिला दरमहा रुपये ५,०००/– व अर्जदार क्र.२ याला दरमहा रूपये २,०००/– अंतरिम पोटगी द्यावी. |

| | |
|---|---|
| ५. | अर्जदारांनी गैरअर्जदारांच्या विरोधात मागीतलेला मालमत्ता हस्तांतरणाबाबतचा तात्पुरता मनाई हुकूमाचा आदेश अमान्य करण्यात येतो. |
| ६. | सदर अधिनियमाच्या कलम २४ नुसार प्रस्तुत आदेशाची प्रत अर्जदारांना विनामूल्य देण्यात यावी. |

(एन.जे.चव्हाण)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
(न्यायालय क्र.३), उदगीर

उदगीर
दिनांक– १८/०३/२०२३